Tribal Development Dept., Govt. of Maharashtra
Tribal Development Commissionerate
आदिवासी विकास आयुक्तालय
आदिवासी विकास भवन, पहिला मजला, गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक
दूरध्वनी क्र. २५७५६१५, २३१७९३८ ई-मेल :- admnctd.nsk-mh@mah.gov.in
वेबसाईट : https://tribal.maharashtra.gov.in

क्र.प्रशा-२०२५/प्र.क्र.६५/का.२(८)/ ६२६७ दिनांक : २१ जुलै, २०२६

आदिवासी विकास विभाग भरती २०२६

चौकीदार(गट-ड)

सुधारित जाहीर सुचना

आदिवासी विकास विभागामार्फत दिनांक २९.०४.२०२६ रोजी चौकीदार(गट-ड) या संवर्गाची ४७८ पदाकरिता जाहीरात प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर पदाची लेखी परिक्षा दिनांक २८ जूलै २०२६ ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेली असून **गटनिहाय वेळापत्रक** दिनांक १३/०७/२०२६ रोजी प्रसिध्द केलेले आहे. उमेदवारांना त्यांचे प्रवेश पत्र (Admit card) परीक्षेच्या ७ दिवस अगोदर उपलब्ध होईल.

प्रवेशपत्र विभागाचे संकेत स्थळ https://tribal.maharashtra.gov.in यावर https://tdcwatchman २०२६.cbtexam.in या लिंकवर उपलब्ध करुन दिली जाईल. सदर लिंक वर उमेदवारांनी त्यांचे प्रवेश पत्र व त्यामध्येच मार्गदर्शक सुचनांसह उपलब्ध करुन घ्यावे. उमेदवाराने ज्या प्रकल्प कार्यालयासाठी स्वतंत्र अर्ज केला असेल त्यांची परीक्षा वेळापत्रकातीलनमुद गटाप्रमाणे परीक्षा केंद्रावर होईल व त्याचे प्रवेशपत्र सुध्दा वेगवेगळया गटानुसार उपलब्ध करुन दिले जातील, याची नोंद घ्यावी.

गट -ड चे नियुक्ती प्राधिकारी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय हे असल्याने, चौकीदार पद भरती -२०२६ संदर्भात ऑनलाईन परीक्षा, परीक्षा केंद्रावरील समन्वयक, व संनियंत्रण करणेची जबाबदारी पार पाडणे व भरती प्रक्रियेशी संबंधित अनुषंगिक बाबींबाबत संपूर्ण कार्यवाही संबंधित प्रकल्प अधिकारी करतील, याची नोंद घेण्यात यावी.

Leena M Bansod

लीना बनसोड (भाप्रसे)
आयुक्त आदिवासी विकास
महाराष्ट्र राज्य, नाशिक